## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १४० /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०३/२०१८

**१) ऑटो पल्टी झाल्याने उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :–**

दिंनाक २२/०१/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील मृतक गिरीधर बापु मेश्राम वय ५८ वर्ष, रा. मुंडीपार हा साकोली वरून मुडींपार येथे ऑटो मध्ये बसुन एनएच ०६ रोडने जात असता जांभळी सडक फाटया जवळ ऑटोचा टायर फुटुन ऑटो पलटी झाल्याने, त्यात मृतक हा जखमी होवुन त्याला प्राथमीक उपचार उपजिल्हा रूग्णालय साकोली येथे रेफर केल्याने, त्यास मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान १०/०२/२०१८ चे ११.१५ वा. मरण पावल्याने पो.स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र जा. क्र. ८३/१८ नुसार प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी सफौ.कंगाले यांचे रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. निंबेकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**२) अज्ञात वाहन चालकांच्या धडकेत पायी जाणाऱ्या इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक १७/०३/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील मृतक युवराज पंढरी कान्हेकर वय ४८ वर्ष, रा. पंचखेडी हा डोंगरगाव पेट्रोल पंप समोरील एनएच ६ रोड पायी क्रास करीत असता एनएच ६ राडने जाणाऱ्या यातील आरोपी अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन मृतक यास धडक देवुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी नितीन मोहन तिरपुडे वय २१ वर्ष, रा. धारगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. सहकलम १८४,१३४(ब) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आळे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**३) अज्ञात वाहनांच्या धडकेत इसम गंभिर जखमी होवुन उपचारा दरम्यान मृत्यु :–**

दिंनाक २१/०१/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील मृतक कांतीलाल तेतराम पारधी वय ५४ वर्ष, रा. हडबड जि. गोदिंया हा पायी देव्हाळी वरुन माडगी कडे जात असता यातील आात आरोपी मोटार सायकल ही निष्काळजीपने चालवुन मृतकास धडक मारुन गंभिर जखमी केल्याने त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने अपघातास व मृतकचे मरणास कारणीभुत झाल्याने पो.स्टे अजनी नागपुर येथे मर्ग ००/१८ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. बर्वे यांचे रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. सहकलम १३४/१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मेश्राम पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) सोन्याच्या दागीन्यांची चोरी. :–**

दिंनाक १५/०३/२०१८ ते १६/०३/२०१८ चे रात्र दरम्यान यातील फिर्यादीचे वडील बालकदास डोंगरे हे घरी समोरील बैठक रूम मध्ये झोपले असतांनी कोणीतरी अज्ञात चोराने घराचे मागील दाराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करुन बेडरूम मधील ठेवलेल्या आलमारीतील १५ ग्रॅम सोन्याचा गोफ, १० ग्रॅम सोन्याचा गोफ, १०,ग्रॅम सोन्याचा मंगळसुत्र ५ ग्रॅम सोन्याची अंगठी २.५ ग्रॅम सोन्याच्या कुडया, २ ग्रॅम सोन्याचे रिंग १.५ ग्रॅम सोन्याची पुण्यशाही नथ, १.५ ग्रॅम सोन्याची फुली असा एकुन ७२,०००/रु. चा माल चोरून नेल्याने, फिर्यादी सुनील बालकदास डोंगरे वय ४८ वर्ष रा. मुरमाडी वार्ड क्र. ०४ यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पोहवा काटेखाये पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**५) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन विद्युत केबलने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिंनाक १७/०३/२०१८ चे १५.४८ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे गोदिंया बस डेपोची बस बस क्र. एम ४० एन ८५६५ ने नागपुर वरुन गोदिंया कडे प्रवासी भरुन भंडारा मार्गे वैनगंगा नदीचे मोठया पुलीया वरुन जाण्यास निघाला असता रोडवर वाहतुक बंद असल्याने गाडी उभी केली होती. ती गाडी पुढे घेवुन जाण्यास निघाला असता समोरील टाटा माझा गाडी क्र. एमएच ३६ एच ४२४८ च्या आरोपी चालकाने फिर्यादी हा पुर्ण वर्दीत असल्याचे माहित असुन सुध्दा यातील आरोपीने फिर्यादीस तु गाडी कशाला समोर नेली, असे म्हणुन शिवीगाळ करुन धमकी देवुन विद्युत केबलने डोक्याचे मागील बाजुला मारुन जखमी केल्याने फिर्यादी लेखी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५३,३३२,३२४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**६) जुन्या वादावरुन लाथा बुक्यांनी व दगडाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिंनाक १६/०३/२०१८ चे १३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा पती नरेश गमा निपाने वय ५० वर्ष, रा. आंधळगाव हा घरी घटनेवेळी खर्रा खाण्यास पानठेल्यात गेला तेव्हा त्याचा मित्र महाज अली नुर अली सैयद वय ५७ वर्ष, रा. आंधळगाव यास जुने पैसे मागितले त्या कारणावरुन त्याचा मुलगा आरोपी याने फिर्यादीचे पतीस लाथा बुक्यांनी व दगडाने मारहान करुन जखमी केल्याने फिर्यादी सौ. सुनीता नरेश निपाने वय ४५ वर्ष रा. आंधळगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. गुरनुले पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**७) दखल पात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिंनाक १७/०३/२०१८ चे ००.५ ते ००.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी हा अंधारात आपले अस्तीत्व लपवुन दखल पात्र गुन्हा करण्याच्या बेतात मिळुन आल्याने, त्यास सरतर्फे र्यादीची पोशी. जावध यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १२२ (ई) मपोका.अन्वये गन्हा नोंद करण्यात आला पुढील तपास पोहवा. सोरते पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**८) विहीरीचे पाण्यात उडी घेवुन बुडुन महिलेचा मृत्यु :—**

दिंनाक १७/०३/२०१८ चे ००.३० वाजता दरम्यान यातील मृतक मंजुषा नेपाल चाचेरे वय ३२ वर्ष रा. गोंदीया कुडवा ही मानसीक आजाराला त्रासुन घरी असलेल्या विहीरीचे पाण्यात बुडुन मरण पावल्याने, फिर्यादी महेश वामनराव मेश्राम वय २८ वर्ष रा. पालांदुर यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन पालांदुर करीत आहेत.

**९) प्रसुती दरम्यान महिलेचा मृत्यु :—**

दिंनाक ०४/०३/२०१८ चे १२.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. वंदना सुर्यभान मानकर वय ३२ मांगली हिचे गर्भधारना ९ महिने झाल्याने तिचे पोटात दुखणे सुरु झाल्याने तिला सामान्य रुग्णालय भंडारा येथे भरती करुन सिजरींग व्द्ारे प्रसुती करण्यात आल्याने तिची प्रकृती बिघडल्याने तिला मेडीकल कॉलेज नागपुर येथे रेफर करण्यात आले. असता मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. जांभुळकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भेंडारकर पोलीस स्टेशन पालांदुर करीत आहेत.

**१०) औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु :—**

दिंनाक ०३/०३/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. पंचफुला रामदास गोदरी वय ५० वर्ष, रा. देवराडा नर्सिंगटोला ही आपले मुला सोबत मोटार सायकल वर बसुन जात असतांना मोटार सायकल वरुन खाली पडुन जखमी झाल्याने तिला औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक ०४/०३/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. बर्वे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**११) किटक नाशक औषध प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान तरुणाचा मृत्यु :–**

दिंनाक ०२/०३/२०१८ चे २०.४५ वाजता दरम्यान यातील मृतक कृष्णा फुलचंद बसीने वय २२ वर्ष, रा. खुटसावरी याने घरचे शेतात दारुचे नशेत फवारणीचे किटक नाशक औषध प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक ०८/०३/२०१८ ला मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निरगुडे पोलीस स्टेशन मोहाडी करीत आहेत.

**१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १७/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०७, तीन सिटर वाहनाकरीता १२ ईतर वाहनांवरती – ९४ केसेस करण्यात आले आहे

V.R. Chouhan ASI 46L

( व्ही. आर. चव्हाण )

नियंत्रण कक्ष अधी.

भंडारा करीता

दुरध्वनी.क्र. ९७६४५७५४२७

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.